# पशुउत्पादन व व्यवस्थापन विभाग
# स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला

जावक क्र. सह.अधि./स्ना.प.प.वि. संस्था/ 5121/17
सहयोगी अधिष्ठाता यांचे कार्यालय,
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला
दि. 16/06/2017

## दरपत्रक मागविण्याची सूचना

**विषय** : ठेका पद्धतीने **प्रक्षेत्रावरील** मजुरीची कामे करणेबाबतच्या मोहोरबंद दरपत्रक सादर करणे बाबत.....

स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला येथील पुर्णाथडी म्हैस प्रक्षेत्र व संलग्नित चारा विभागात खालील मजुरीची कामे करण्याकरीता ठेका पद्धतीने काम देण्याचे (Labor Work Contract) प्रस्तावीत आहे. (प्रक्षेत्रावर एकुण लहान मोठी 26 जनावरे आहेत, 17 एकर जमीन आहे.)

**कामाचा तपशिल पुढिल प्रमाणे आहे :**

1. जनावरांच्या गोठ्यातील मलमुत्र दररोज काढणे, गोठा दररोज स्वच्छ करणे, मलमुत्राची नाली साफ करणे, इत्यादी.
2. जनावरांना दररोज पाणी पाजणे, चारा / खाद्य टाकणे.
3. जनावरे पाण्याने धुणे, पाण्याची टाकी साफ करणे.
4. जनावरे चारायला नेणे, व नंतर परत आणून बांधणे.
5. दररोज दोन वेळा दुध काढणे.
6. संकलीत दुध विक्रीस मदत करणे.
7. संकलीत दुध सायकलवर कॅनने दुध डेअरीवर जमा करणे.
8. जनावरे उपचारासाठी दवाखाण्यात नेणे.
9. दुधाच्या कॅन स्वच्छ करणे.
10. गोठ्यातील शेण खड्यात (Mannure Pit) पुरणे.
11. खाद्याची पोती/भेली खाद्य भंडार येथुन आणणे.
12. चारा व पशुखाद्याची ने – आण करणे. व खाद्य भंडार येथे व्यवस्थित ठेवणे.
13. परीसरातील गवत काढणे व परीसर स्वच्छ ठेवणे, वाळलेली झाडे तोडणे, झाडांच्या फांद्या छाटणे.
14. प्रक्षेत्रावरील यंत्रे दुरूस्ती व त्यासारख्या आपतकालीन कामात मदत करणे.
15. पेरणीसाठी शेत तयार करतांना मदत करणे.
16. सऱ्यावाफे–दांड–तयार करण्यात मदत करणे.
17. पेरणी करण्यास मदत करणे
18. चारा प्रक्षेत्रा वरील चारा पिकांना पाणी देणे.
19. शेता मध्ये खत पसरवणे.
20. गरज पडल्यास पिकांवर किटक नाशकांची फवारणी करणे.
21. निंदन करणे.
22. चारा कापणी.
23. थोंब काढणे.
24. कर्तव्यावर असतांना प्रक्षेत्रावरील मालमत्तेची देखरेख करणे.
25. प्रक्षेत्रावरील यंत्रे दुरूस्ती व त्यासारख्या आपतकालीन कामात मदत करणे.
26. कर्तव्यावर असतांना प्रक्षेत्रावरील मालमत्तेची देखरेख करणे.
27. वेळेवर उद्भवलेली सर्व कामे करणे.
28. संबंधीत अधिकाऱ्यांनी, **कर्मचाऱ्यांनी**, वरीष्ठांनी वेळोवेळी सांगितलेली कामे पार पाडणे.

**अटी व शर्ती:**

1. दर प्रती दिन प्रमाणे नमूद करावे.
2. कंत्राटदाराकडे बँक खाते असणे आवश्यक आहे.
3. दरपत्रक/ दरपत्रके स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे पूर्ण अधिकार मा. सहयोगी अधिष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, अकोला यांना राहतील.
4. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर ठळक अक्षरांत 'दरपत्रक-मजूर कंत्राट' असे लिहावे.
5. दरपत्रकावर तसेच सदर दरपत्रक ज्या लिफाफ्यात सीलबंद केले आहे त्या लिफाफ्यावर या दरपत्रक मागविण्याच्या सूचनेचा क्रमांक संदर्भ क्रमांक म्हणून लिहावा.
6. मोहोरबंद दरपत्रके मा. सहयोगी अधिष्ठाता, स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था, स्ना.प.प.वि.सं., अकोला-4 या पत्यावर दिनांक 22/06/2017 च्या सायंकाळी 05:30 वाजेपर्यंत किंवा तत्पूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावेत.

16/06/2017

**सहयोगी अधिष्ठाता**
स्नातकोत्तर पशुवैद्यक व पशुविज्ञान संस्था,
अकोला-४४४१०४